# रे.क.नं. ७०/२०१४ मध्ये निशाण ९९ खालील आदेश.

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६नियम १५ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ यांनी कोर्ट कमिशन खर्चातील निम्मी रक्कम रुपये २०००/– व्याजासहीत न्यायालयात जमा करणेबाबत आदेश होणेसाठी दाखल केला आहे.

२. यातील प्रतिवादी क्रमांक १ यांनी निशाण १०२ ला त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर मागणी केलेली मोजणी खर्चाची अर्धी रक्कम रुपये २०००/–प्रतिवादी क्रमांक १ ने त्याचवेळी वादीकडे दिलेली आहे व त्यानंतर वादीने स्वतःच्या नावाने जरुर ते चलन भरलेले आहे असे म्हणणे दाखल करुन अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

३. यातील वादी तर्फे विद्वान वकिल श्री. पी.यु.गायकवाड आणि प्रतिवादी तर्फे विद्वान वकिल श्री. सी.एस.शिखरे यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीचे असे कथन आहे की वादी यांनी निशण ३७ व ३८ नुसार कोर्ट कमिशनच्या खर्चाची रक्कम रुपये ४०००/– भरणेबाबत या न्यायालयाने दिनांक १४.०६.२०१४ आदेश केला होता. सदर आदेशाप्रमाणे यातील वादी यांनी दिनांक २१.११.२०१४ रोजी सदर रक्कम चलन करुन भरलेली आहे. सदर कमिशन आदेशामध्ये वादी व प्रतिवादी क्रमांक यांनी अर्धी अर्धी रक्कम भरणेचा आदेश झाला होता. वादीचे असे कथन आहे की त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्रमांक १ कडे निम्मी रक्कम रुपये २०००/– मागणी केली होती त्यावेळी प्रतिवादी क्रमांक १ यांनी सद्या माझ्याकडे रक्कम रुपये २०००/– नाहीत कृपया आपण स्वतःची रक्कम भरावी आणि सदरची रक्कम मी पंधरा दिवसात देतो अशी त्यावेळी विनंती केली होती त्यामुळे वादी

यांनी संपुर्ण रक्कम स्वतःची भरणा केली होती. त्यानंतर वादी यांनी प्रतिवादी क्रमांक १ कडे सदरची रक्कम रुपये २०००/– ची वरचेवर मागणी केली असता आज देतो उद्या देतो असे म्हणून प्रतिवादी क्र.१ हा वेळ मारुन देत होता. त्यानंतर आज अखेर प्रतिवादी क्रमांक १ यांनी सदर रक्कम देणेची व्यवस्था केली नाही. त्यामुळे अशाप्रकारे सदर रक्कमेची मागणी वादीने या अर्जाद्वारे केलेली आहे. याचे विरुध्द प्रतिवादी क्रमांक १ चे असे कथन आहे की या प्रतिवादींनी आदेशाप्रमाणे त्याचवेळी वादीकडे रक्कम रुपये २०००/– दिलेले आहेत आणि वादीने त्याचे नांवे ४०००/– रुपयेचे चलन भरुन रक्कम भरलेली आहे असा बचाव घेतला आहे. सदर रक्कम दिनांक १४.०६.२०१४ रोजी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रत्येकी १/२ हिश्याने भरलेली नाही. सदरची रक्कम भरुन दोन वर्षे ४ महिने पुर्ण झालेले आहेत .सदरचा अर्ज इतक्या प्रदीर्घ विलंबाने वादीने का दिला आहे याचे कारण नमुद नाही. त्यामुळे वादीने केलेला अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादी क्रमांक १ ने केली आहे.

५. निशान ३७ व ३८ वरील आदेशाचे अवलोकन करता कमिशन फी वादी आणि प्रतिवादी क्रमांक १ यांनी संबंधीत कार्यालयात जमा करणेची आहे ही गोष्ट खरी असलेचे दिसून येते. त्यानंतर यातील वादी यांनी कमिशन आदेशाप्रमाणे त्याचे नांवे चलन भरुन फी भरलेचे देखील दिसून येते. दावा दाखल करते वेळी वादी स्वतः काम पाहत होते. परंतू त्यानंतर वादी तर्फे मुखत्यार म्हणून श्री. सुंदर शामराव पांढरे हे दिनांक १०.०९.२०१६ पासून या दाव्याचे कामकाज पाहत होते. प्रस्तुत कामातील मुळ वादी जगन्नाथ यांनी आजअखेर प्रतिवादी क्रमांक १ यांना निम्मी कमिशन फी दिलेली नाही अशी हरकत आजअखेर नोंदविलेली नाही. तसेच मुळ वादी यांनी कमिशन कामकाज पुर्ण झालेनंतर देखील कमिशन अहवालाचे म्हणणे देणे अशाप्रकारची हरकत निशाण ७५ च्या म्हणण्यामध्ये नोंदविलेली नाही अगर मुळ वादी यांनी अशाप्रकारची हरकत कमिशन

कामाकाजावेळी कमिशनर समोर, या न्यायालयाचे समोर नोंदविलेली नाही. कमिशन अहवाल आल्यानंतर यातील वादी यांनी दुबारा कमिशन व्हावे म्हणून दुसरा कमिशन अर्ज निशाण ७६ ला दिलेला होता. परंतु त्या अर्जामध्ये देखील मुळ वादी यांनी प्रतिवादी क्रमांक १ ने कमिशन फी दिली नाही या बाबत हरकत नोंदविलेली नाही. त्यामुळे इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतर वादीने कमिशन फी मागणेचा अर्ज केला याबाबत शंका उपस्थित होते.

६. यातील वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १५ प्रमाणे दाखल केलेला आहे. सदर तरतुदींचे अवलोकन करता असे दिसून येते की न्यायालयात दाव्यातील पक्षकारांनी कमिशन कामाचा आवश्यक खर्च घालून दिलेल्या मुदतीत जमा करणेबाबत आदेश करावा यासंबंधी आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेल्या अर्जाला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १५ ची तरतुद लागू होत नाही. प्रतिवादी क्रमांक १ यांनी १/२ कमिशन फी रक्कम वादीला दिली नाही याबाबत कोणताही सकृत दर्शनी पुरावा पटलावर उपलब्ध नाही. अशाप्रकारे प्रदीर्घ कालावधीनंतर कोणत्या कारणाने अर्ज दिला ते कारण देखील वादी स्पष्ट करु शकत नाही. त्यामुळे वादीने दिलेल्या अर्जाचा दिवाणी प्रक्रिया संहितेतील कोणतीही तरतुद चालू शकत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज रद्द करणेच्या निर्णयावर मी येत आहे म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश.**

वादीचा नि. ९९ चा अर्ज खर्चासहीत रद्द करणेत येत आहे.

सही/-
(सं.मा.जाधव)
दुसरे सह. दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.
पेठवडगांव.

पेठवडगाव
दि.३.५.२०१७

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 03-05-2017. |
| Judgment signed by the P.O. on | 03-05-2017. |
| Judgment/Order uploaded on | 06-05-2017. |